# आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे,
# आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कुळगांव बदलापूर

## अहवाल

आदर्श विद्या प्रसारक संस्थेच्या आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या IQAC विभागातर्फे आंतरमाहाविद्यालयातील निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी पुढील विषय देण्यात आले होते, ज्यातून विद्यार्थ्यांच्या वैचारिक क्षमतेत वाव मिळवून देण्याचा आआपला हेतू होता.

१) भारताची अवकाश झेप

२) स्वतंत्र भारताचा अमृत महोत्सवी वाटचालीतील महत्वाची घटना

३) भारताचा शैक्षणिक विकास

४) भारतातील शेतीविषयक धोरणे

५) भारतीय संस्कृतीची बलस्थाने

६) स्वतंत्र भारताची अमृत महोत्सवी वाटचाल आणि स्त्री सक्षमीकरण.

प्रस्तुत स्पर्धेत एकूण १९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला व ४ विद्यार्थ्यांनी पारितोषिकही पटकावली. याचे आदर्श महाविद्यालय, मोरे महाविद्यालय, पोलादपूर, NKT महाविद्यालय, सतीश प्रधान महाविद्यालय.

यातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला या स्पर्धेला आपल्या मा. प्राचार्या डॉ. वैदेही दप्तरदार यांचे मार्गदर्शन मिळाले तसेच डॉ. प्रतिभा टेंबे यांनी परीक्षक म्हणून कार्य केले. सर्वांचे मनःपूर्वक आभार.

या निबंध स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे:-

१) प्रथम क्रमांक - कांचन दत्तात्रय म्हसकर (SYBA) आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय

२) द्वितीय क्रमांक - काव्यश्री महेश खरे (SYBCOM) आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय

३) तृतीय क्रमांक (विभागुन) - 1.परेश रघुनाथ लाड (TYBA) आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय

2.साक्षी सतिष जाधव (SYBA) सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पोलादपूर



## आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे,

## आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय,कुळगांव-बदलापूर

# अहवाल

आदर्श विद्या प्रसारक संस्थेच्या आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयातर्फे समाजाभिमुख कार्यक्रम नेहमीच आयोजित केले जातात. याच अनुषंगाने, संस्थात्मक सामाजिक जबाबदारी या उपक्रमा अंतर्गत दि. कल्याण जनता सहकारी बँक संचालक सामाजिक पुरस्कार निधी न्यास यांच्या संयुक्त सहभागाने दि. १ फेब्रु. २०२२ रोजी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ' दुर्दम्य लोकमान्य ' या माहितीपटाचे प्रसार करण्यात आले. प्रथम पाहुण्यांनी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर मा. श्री. दीपक देशपांडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले ज्यामध्ये त्यांनी सामाजिक सेवा न्यासाची कार्य उद्दीष्टे व वाटचाल याबाबत माहिती दिली. सर्व मान्यवरांचा पुस्तक व नाविन्यपूर्ण पर्यावरण पूरक गुच्छ देऊन महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. 'दुर्दम्य लोकमान्य ' या माहितीपटाची पूर्वपीठिका अत्यंत आवेशपूर्ण शब्दात व भावनांनी परिपूर्ण वातावरण निर्मिती करून मा. श्री. चंद्रकांत जोशी यांनी मांडली ज्यामुळे माहितीपट पाहण्याची उत्सुकता अधिकच वाढली. माहितीपट प्रसारणानंतर सर्वच प्रेक्षक भारावून गेले होते. एक वेगळी ऊर्जा सर्वांना जाणवत होती व कार्यक्रमाचे उद्दीष्ट सफल झाल्याचे जाणवत होते. यानंतर आदर्श विद्या प्रसारक संस्थेतर्फे सहसचिव मा. श्री. बावीस्कर सर यांनी अध्यक्षीय भाषण केले. आदर्श विद्या प्रसारक संस्था हे सामाजिक उपक्रमांचे केंद्र आहे असे त्यांनी नमूद केले व भविष्यातही असे उपक्रम घेतले जातील असे आश्वासनही दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाच्या प्राचार्या. डॉ. वैदेही दप्तरदार ज्या स्वतः दि. कल्याण जनता बँकेच्या एक संचालक देखील आहेत. यांनी बहारदार पणे केले व 'आदर्श संस्था म्हणजे बदलापूर मधील शांतीनिकेतन आहे ' असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे ऋणनिर्देश प्रा. दक्षा हलकारे यांनी केले पसायदान होऊन कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमात सर्वश्री दीपक देशपांडे, मोहन आघारकर, डॉ. रत्नाकर फाटक, चंद्रकांत जोशी, पद्मनाभ जोशी यांच्या समवेत आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष श्री जनार्दन जी घोरपडे , श्री. उदय केळकर ,
प्रा. पंढरीनाथ बाविस्कर , श्रीमती शंकुतला चुरी , श्री तुषार आपटे यांची उपस्थिती होती.

